# संविधानीक तत्वज्ञान आणि वर्तमान मुल्यहीन राजकारण

**डॉ. नितेश आर. रामटेके**
सहाय्यक प्राध्यापक
श्री गोविंदप्रभु कला व वाणिज्य
महाविद्यालय, तळोधी (बाळापुर)
मो.क्रमांक – ८३२९७५६२४

**प्रस्तावना :–**

भारतीय प्रजासत्ताकाला सात दशके पूर्ण झाली आहेत. २६ जानेवारी १९५० रोजी स्वतंत्र भारताच्या संविधानाच्या अंमलबावणीला सुरूवात झाली. संविधानाने प्रजासत्ताक गणरज्य शासनपध्दती स्विकारून त्याव्दारे सर्व भारतीयांना स्वातंत्र्य, समता, बंधूता, सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय प्राप्त करून देण्याचे अभिवचन संविधानाच्या सरनाम्यात दिले आहे.स्वातंत्र्योत्तर भारतामध्ये अगदी तळागाळातील व्यक्तीला आपला सर्वांगीण विकास करून घेता येईल. त्याला मानसन्मानाचे जीवन जगता येईल, तीच्या राहणीमानाचा दर्जा उंचावेल, तिच्या आशा आकांक्षा पूर्ण होतील आणि एक व्यक्ती म्हणून तीला समाजात समानतेचा दर्जा प्राप्त होईल यासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करणे ही राज्याव्यवस्थेची जबाबदारी असेल. अशी परिस्थिती निर्माण करतांना कोणत्याही कृत्रीम आधारावर भेदभाव करण्यात येणार नाही अशी हमी संविधानाने दिलेली आहे.

भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेत उधृत करण्यात आलेली उपरोक्त उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र भारतामध्ये लोकशाही व्यवस्था स्विकारण्यात आली पाहिजे असे संविधानकारांना वाटत होते. लोकशाही व्यवस्थामध्येच या उद्दिष्टांच्या पूर्तीची क्षमता आहे. लोकशाहीशिवाय अन्य कोणत्याही मार्गानी या उद्दिष्टांची पुर्ती होऊच शकत नाही असा संविधानकारांचा विश्वास होता. लोकशाहीबद्दल मत व्यक्त करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात ‘‘लोकशाही हीच एक अशी व्यवस्था आहे की, ज्यामध्ये रक्ताचा एक थेंबही न सांडविता सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवून आणता येते’’ १

**सांसदीय लोकशाहीचा स्विकार**

स्वातंत्र्यानंतर भारतीय संविधानकारांनी भारतासाठी सांसदीय लोकशाही स्विकारली. ही सांसदीय लोकशाही ब्रिटनकडून स्विकारली असली तरी ती जशीच्या तशी स्विकारलेली नाही. भारतीय संविधानकारांना पश्चिमी उदारमतवादी प्रतिनिधीक लोकशाही व्यवस्थेतील उणिवांची जाणिव होती आणि म्हणूनच ब्रिटीश सांसदीय लोकशाही पेक्षा अधिक उन्नत, अधिक प्रगल्भ अशा लोकशाही राज्यपध्दतीचा शोध भारतीय तत्वचिंतक घेत होते.२ सांसदीय लोकशाहीचा स्विकार करतांना भारतीय तत्वचिंतकांनी व समाजसुधारकांनी पश्चिमी लोकशाहीचे अंधानुकरण केले नाही, तसेच ती निव्वळ पश्चिमी म्हणून, परकिय संकल्पना म्हणून तिचा धिक्कार करीत ऐतद्देशी परंपरांचे पूनरूज्जीवन करीत भारतीय लोकशाहीचा एक पश्चिम द्वेशी साचाही त्यांनी अट्टाहासाने बनविला नाही. उलट पश्चिमी प्रबोधनाच्या मानवतावादी मूल्यांचा स्विकार करीत, त्या प्रकाशात एतद्देशीय परंपरा व संस्थांची चिकित्सा करीत भारतीय

लोकशाहीचा ढाचा व मूल्यात्मक आशय स्वतंत्र प्रज्ञेने निर्धारीत केला. व्यक्ती आणि समष्टीच्या नात्यातील तोल कसा सांभाळायचा, स्वातंत्र्य आणि समता यातील द्वंद्वाचे समाधानकारक निरसन कसे करायचे, अल्पसंख्याक आणि बहुसंख्यांक यांच्यातील नाते कसे अधिक निकोप ठेवायचे. उपासना, स्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्षता यातील संतुलन कसे साधायचे, खाजगी जीवन आणि सार्वजनिक जीवन यांच्यातील सिमारेषा कशा ठरवायच्या राज्यासंस्थेचे सबलीकरण आणि मर्यादीत शासन यातील द्वंद्व कसे मिटवायचे हे सारे लोकशाही तत्वज्ञानापुढिल प्रश्न आहेत. आधिनुक भारतातील अनेक राजकीय तत्वचिंतकांनी व समाज धुरीणांनी यावर आपली वैचारीक मते मांडली तीच सार रूपाने भारताच्या संविधानामध्ये प्रकट झाली. त्यांतूनच भारतीय लोकशाहीचे तत्वज्ञान विकासीत झाले.

नव्याने स्वतंत्र झालेल्या देशासमोर जे प्रश्न असतात ते भारतासमोरही होते. स्वातंत्र्यासोबत आलेले एक भयानक संकट म्हणजे भारत आणि पाकिस्थानची फाळणी. इंग्रजांनी भारतातून जाता . जाता भारतीयांना फाळणीसारख्या दु:खद प्रसंगात ढकलले. या प्रसंगात लक्षावधी लोकांचे पुनर्वसन, देशातील सहाशेवर संस्थानाचे विलिनीकरण व राष्ट्रांचे भौगोलीक एकत्रीकरण, काश्मीरात पाकिस्तानी टोळ्यांनी केलेले आक्रमण आणि चिनने तिबेटसह भारताच्या सिमेवर प्रस्थापित केलेला आपला हक्क याशिवाय अन्नटंचाई, दारिद्रय, बेकारी, अंधश्रध्दा, जातीयता, अस्पृश्यता, सांप्रदायीकता, प्रदेशवाद, भाषावादाची समस्या यासारख्या समस्यांची हाताळणी, नविन सरकारची स्थापना, शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे यासारख्या प्रश्नांना देश सामोरे जात असतांना स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावर देशाला अनेक मार्गांनी त्रास सहन करावा लागला. या सर्व प्रश्नांना सुरूवातीच्या काळात धैर्याने तोंड देत भारताने जगाला सर्वात मोठ्या लोकशाहीचा डोलार सांभाळणारा देश म्हणून स्वत:ची प्रतिमा निर्माण केली.

**लोकशाही एक जीवनपध्दती**

भारताच्या घटना समितीतील बहुसंख्य सभासद राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीतून आलेले होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीला निश्चित प्रकारचे तात्विक अधिष्ठान होते. या चळवळीतील एक प्रमुख शक्ती असलेल्या किंबहूना राष्ट्रीय चळवळीचा मुख्य प्रवाह मानल्या गेलेल्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने स्वातंत्र्य आंदोलनाच्या काळातच आपली सामाजिक बांधिलकी स्पष्ट केली होती. लोकशाही तत्वांची पायाभरणी स्वातंत्र्य चळवळीच्या काळातच झाली होती. त्यामुळे घटना समितीचे सदस्य आणि राष्ट्रीय नेत्यांनी लोकशाही शासनव्यस्थेला मान्यता दिली होती. सर्व सामान्य जनतेला खऱ्या अर्थाने न्याय देण्याचे आणि तिच्या स्वप्नांची पुर्ती करण्याचे कार्य लोकशाही व्यवस्थेतच होऊ शकते. असा घटनाकारांचा विश्वास होता.३

भायतीय घटनाकारांचा लोकशाही व्यवस्थेवर विश्वास असला तरी शासनव्यवस्थेचा एक प्रकार एवढ्या मर्यादीत अर्थाने त्यांनी लोकशाहीचा विचार केला नव्हता. त्यांच्या दृष्टिने लोकशाही व्यवस्था एक जीवनपध्दती होती. समाजातील सर्व घटकांना योग्य न्याय मिळवून देणारी, समाजातील सर्व घटकांच्या परस्पर सहकार्याने देशाचा सर्वांगीण विकास घडवून आणणारी एक आदर्श व्यवस्था म्हणून त्यांनी लोकशहीकडे पाहिले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या संदर्भात म्हणतात,''राजकीय लोकशाहीचा पाया सामाजिक लोकशाहीवर भक्कमपणे आधारीत असल्याशिवाय राजकीय लोकशाही

टिकू शकत नाही.'' ४ भारतीय लोकशाहीच्या वाटचालीत सामाजिक व आर्थिक लोकशाहीचा वाटा महत्वाचा आहे.

**भारतीय लोकशाहीचा उत्कर्ष**

१९४७ ते १९६७ पर्यंतच्या कालखंड भारतीय लोकशाहीच्या उत्कर्षाचा कालखंड म्हणावा लागेल. या कालखंडामध्ये भारतीय राजकारणातील नेतृत्व विशिष्ट ध्येयाने प्रेरित झाले होते. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीच्या मुशीतुन ते तयार झालेले होते. त्यामुळे या काळातील राजकारण नितिमत्तेवर आधारीत होते असे दिसून येते. या काळातील नेतृत्वाने राजकीय सत्तेचा वापर सर्वमान्य जनतेच्या हिताकरीता, देशाच्या सर्वांगीण विकासाकरीता आणि देशाच्या रक्षणाकरीता केलेला दिसून येते. देशापुढील समस्या सोडवित असतांनाच घटनाकारांच्या अपेक्षेला व कल्पनेला साक्षात रूप देण्यासाठी कसोशिने प्रयत्न झालेले दिसून येतात. या काळातील नेतृत्वाने देशावरील आक्रमणाचा निर्भयतेने व धिराने केलेला मुकाबला व त्याबरोबर देशांतर्गत शांतता टिकविण्याच्या कामी दाखविलेला मुत्सदीपणा जागतीक राजकारणाने नवाजला. परकीय आक्रमणाच्या वेळी घेतल्या गेलेल्या निर्णयाची दखल आंतरराष्ट्रीय राजकारणाला देखील घ्यावी लागली.

**मुल्यहिन राजकारण :—**

१९६७ पासून भारतीय राजकारणाला उतरती कळा लागलेली दिसून येते. भारतातील प्रदेशिक विविधता, सांस्कृतीक विविधता, स्थानिक मुद्दे, जातीगत भावना, प्रादेशिक विकासाचा असमतोल, पक्षांतर्गत गटबाजी, व्यक्ती केंद्रीत राजकारण इत्यादी कारणांमुळे मोठ्या प्रमाणात प्रादेशिक पक्षांचा उदय झाला. १९६७ च्या राज्यविधानसभा निवडणूकांमध्ये आठ राज्यांमध्ये गैरकॉंग्रेसी सरकारे सत्तारूढ झाली. या काळातील पाकिस्तान सोबतचे युध्द आणि अंतर्गत शांततेच्या प्रश्नाचा वापर राजकीय सत्ता राखण्यासाठी व देशभरातील कार्यकर्त्यावर वचक बसविण्यासाठी होऊ लागला. येथूनच राजकीय मूल्यांच्या घसरणीला सुरूवात झाली आणि उत्तरोत्तर ती वाढतच गेली.

**१) संसदेचा ऱ्हास**

१९५२ पासून तिसऱ्या लोकसभेपर्यंत संसदेमध्ये संसद सदस्यांच्या वर्तनात वैचारीक चर्चा, आपल्या मतदार संघाचे प्रश्न तळमळीने मांडणे, देशातील महत्वाच्या प्रश्नांचा अभ्यास इत्यादी गोष्टी दिसत होत्या. ते चित्र आज अभावानेच पहावयास मिळते. अलिकडे संसद हा कुस्तीगिरांचा आखाडा बनलेला आहे. अधिवेशन काळात सदस्यांचा आरडा—ओरडा, सभागृहात गोंधळ घालणे, विधेयकाच्या प्रती फाडून फेडणे, सभापतीच्या आसनापर्यंत धाऊन जाणे, सभापतीच्या मेजवरील राजदंड पळविणे, अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्यासाठी पैसे घेणे, सरकार वाचविण्यासाठी खासदारांची खरेदी करणे व त्यांचे संसदेत प्रदर्शन करणे, संसदेत नोटांचे बंडले दाखविणे, एकमेकांच्या अंगावर धावून जाणे हे प्रकार नित्याचेच झाले आहेत. संसद सदस्यांच्या अशा असभ्य वर्तनामुळे संसदेच्या प्रभावाचा ऱ्हास होत आहे. संसदेची जनमानसातील प्रतिमा मलीन होत असल्याचे निदर्शनास येते. संसदेचे अशा प्रकारचे अवमूल्यन लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. सांसदीय शासनपध्दतीत संसद सर्वोच्च असते. संसदेतील लोकप्रतिनिधींनी कार्यकारी मंडळावर आणि प्रशासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि सर्वसामान्यांच्या

विकासाठी विविध प्रकारच्या कायद्याची निर्मीती करून या संस्थावर नियंत्रण ठेवावयाचे असते. परंतू आजची परिस्थिती अगदी या उलट आहे.

**२) राजकारणाचे गुन्हेगारीकरण**

निवडणूका हा प्रतिनिधीक लोकशाही राज्यव्यवस्थेचा पाया असतो. निवडणूकीच्या माध्यमातूनच लोकशाही सरकारची स्थापना होत असते. त्यामुळे निवडणूका या नि:पक्ष आणि न्याय वातावरणात पार पाडणे आवश्यक असते. गेल्याच काही वर्षापासून निवडणूक प्रक्रियेला गुंडशाहीने ग्रासलेले दिसून येते. एके काळी असे म्हटले जात होते की, राजकारणी व्यक्ती आपल्या संरक्षणासाठी गुंड पाळत असतात. परंतू आता हे गुंडच स्वत: राजकारणी बनले आहेत. त्यांना आता अन्य राजकारणी व्यक्तीच्या आश्रयाची गरज राहिलेली नाही. निवडणूकांमध्ये मोठ्या प्रमाणांवर पैशाची उधळपट्टी केली जाते. धनशक्ती आणि मनगटाची शक्ती निवडणूकींमध्ये निर्णायक ठरत आहे. त्यामुळे बुध्दीमान आणि चारित्र्यवान माणसे राजकारणापासून स्वत:ला दूर ठेवत आहेत. समाजसेवा, सामाजकार्य, लोकहीत, देशहीत यापासून आजचे राजकारण कोसो दूर गेले आहे. राजकारणात स्वार्थी लोकांचाच भरणा अधिक दिसून येतो. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता असे समिकरण तयार झाले आहे. याआधारे निवडून आलेल्या लोकांकडून सत्तेचा सर्रास दुरूपयोग होत आहे.

**३) भ्रष्टाचार**

भ्रष्टाचार ही भारतीय लोकशाही समोरील फार मोठी गंभीर समस्या निर्माण झाली आहे. भ्रष्टाचाराच्या कॅन्सरने देशाला पुरता विळखा घातला आहे. आज असे एकही क्षेत्र नाही की ज्या क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार नाही. विकासाकरीता मंजूर करण्यात आलेल्या एका रूपयामधील केवळ १५ पैसेच विकास कामापर्यंत पोहोचतात बाकी मध्येच गायब होतात. विकासाच्या नावावर हजारो करोड रूपयाचे देशी आणि विदेशी कर्जे घेऊन सत्ताधाऱ्यांनी केवळ स्वत:चा विकास साधला आहे. राजकारणी दिवसेदिवस गब्बर बनत आहेत. त्यांना पैसे ठेवण्यासाठी देशी बॅंका कमी पडतात म्हणून स्विस बॅंकेचा आधार घ्यावा लागत आहे, आणि देशाच्या तिजोरीत मात्र ठणठणात आहे. रोज वर्तमानपत्राचे पान उघडले की एक नविन घोटाळा, भ्रष्टाचाराचे प्रकरण वाचावयास मिळते. दिवसेंदिवस भ्रष्टाचाराचे विक्रम वाढतच आहेत. भ्रष्टाचाराने या देशाची अर्थव्यवस्था आणि राज्यव्यवस्था पुर्णपणे पोखरून टाकली आहे.

**४) व्यक्तीपुजा आणि घराणेशाही**

राजकारणातील व्यक्तीपुजा किंवा विभूतीपुजा आणि घराणेशाही या दोन्ही गोष्टी लोकशाहीसाठी मारक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात,'धर्माच्या क्षेत्रातील विभूतीपुजा मोक्षाकडे नेते तर राजकीय क्षेत्रात ती अध:पतनाकडे नेते' ५ दुदैवाने भारतीय राजकारणामध्ये विभूतीपूजा मोठ्या प्रमाणावर दिसून येते. एखादया राजकिय नेत्याला भ्रष्टाचाराच्या किंवा लज्जास्पद वर्तन केल्याचा आरोपाखाली अटक झाल्यानंतर जेव्हा त्यांची सुटका होवून तो परत येतो तेव्हा बहुसंख्येने लोक त्यांचे स्वागत करतात, त्यांची मिरवणूक काढतात. जणू तो एखादे युध्द जिंकून मायदेशी परतला आहे. गुन्हेगारांचे अशाप्रकारे स्वागत करण्याची प्रवृत्ती हे व्यक्तीपुजेचेच उदाहरण म्हणावे लागेल. अशी व्यक्तीपुजा लोकशाहीला नेहमीच मारक ठरते. भारतीय राजकारणात घराणेशाहीचा प्रादुर्भावही मोठ्या प्रमाणावर

दिसून येतो. आमदार, खासदार मंत्री, पक्षाचे जेष्ठ नेते यांचे पूत्र आणि कन्या यांचा मोठ्या प्रमाणात राजकारणात शिरकाव झालेला दिसुन येतो. त्यामुळे राज्यकर्त्याचा एक विशिष्ट वर्ग निर्माण होवून राजकीय सत्ता ही काही घराण्यांमध्ये केंद्रीत होतांना दिसून येते. घराणेशाहीमुळे इतर व्यक्तींना सत्तेपासून दुर रहावे लागते. सत्तेवर काही विशिष्ट घराण्यातील लोकांचा एकाधिकार निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे.

**५) इतर घटकांचा प्रभाव**

या सोबतच राजकारणातील जातीयवाटी प्रवृत्तींचा वाढता प्रभाव, धार्मीक कट्टरता, धर्मनिरपेक्षतेच्या तत्वांची पायमल्ली, राजकीय पक्ष व राजकीय नेते यांची विधिनिषेध शून्य वृत्ती, गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना मिळत असलेले राजकीय संरक्षण, प्रशासनातील वाढता भ्रष्टाचार, निवडणूकितील हिंसाचार व गैरप्रकार अशा लोकशाही मूल्यांचा ऱ्हास करणाऱ्या अनेक अपप्रवृत्तींनी भारतीय राजकारणात शिरकाव केल्यामुळे भारतीय राजकारण पूर्णपणे नासून गेले आहे. निवडणूकीच्या माध्यमातून सरकार स्थापन होणे केवळ लोकशाहीचा देखावा आहे.

**सारांश**

'ज्या देशात चारित्र्य उरलेले नाही आणि ज्या देशाला नितिमत्ता नाही त्या देशाचे भवितव्य अतिशय खडतर आहे' ६ वरील विवेचनावरून भारताला नैतीक चारित्र्यच उरलेले नाही असेच दिसून येते. लोकशाही मूल्ये पायदळी तुडविली जात आहेत. लोकशाही मूल्ये व तत्वे यांना उघडपणे विरोध करणाऱ्या राजकीय शक्ती आज देशात कार्यरत आहेत, आणि त्यांना राजकीय संरक्षण प्राप्त होत आहे. मोठमोठे बिल्डर, वाळू माफिया, टोलमाफीया, व गुंड यांच्याशी राजकिय नेते हात मिळवणी करतांना दिसून येत आहेत. तत्वनिष्ठा, प्रामाणिकपणा, त्याग, सेवाभावीवृत्ती, समता बंधूभाव इत्यादी गोष्टी राजकारणातून हद्दपार झालेल्या आहेत. त्याऐवजी झुंडशाही, बलप्रयोग, हिंसाचार, पैसा, जात या गोष्टींना राजकारणात महत्व प्राप्त होत आहे. त्यातुनच दहशवाद आणि नक्षलवादासारख्या देशविघातक चळवळी फोफावतांना दिसत आहेत. या अशा परिस्थितीत आताची राजकिय ओढाताण देशाला कायमच्या अस्थिरतेकडे नेईल की काय? अशी भिती भारताच्या राजकीय व्यवस्थेबाबत निर्माण झाली आहे.

**संदर्भग्रंथ सुची**


- वि. र. काळे : धम्मचक्रप्रवर्तक ज्ञानयोगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वसंतबुक स्टॉल, मुंबई, २००९ पृ. २४३
- यशवंत सुमंत : भारतीय लोकशाहीचे चर्चाविश्व, काही निरीक्षणे, विचार मंथन, संशोधन पत्रिका, जानेवारी २०१३ अंक १८, पृ. २६
- डॉ. भा.ल.भोळे : भारतीय राज्य व्यवस्था, पिंपळापुरे अॅड कं. पब्लिशर्स, नागपूर ११९०, पृ १ व २
- प्रा. शेख हाशम, प्रा. देशमुख, प्रा. पाटील : भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचारवंत – विश्व पब्लिशर्स अॅड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर १९९८ . ९९ पृ.६३